| | |
|---|---|
| MHKO100002112019 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ३०/२०१९</u>**<br><br>मारुती शंकर कागिलकर.<br>//वि//<br>आण्णाप्पा गोविंद कागिलकर- म.वा. वगैरे. |

## <u>निशाणी क्र. ४६ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत" चा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जास नि.४७ येथे म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटप व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.२ व ३ यांना दिनांक २९/०८/२०१९ रोजी समन्सची बजावणी होऊन ते हजर झाले. परंतु, त्यांनी कैफियत दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक १५/०२/२०२० रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २१/११/२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी असे कारण नमुद केलेले आहे की, दरम्यानचे काळात दावा मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान आपसात तडजोड चर्चा मे. न्यायालयाबाहेर गावपातळीवर सुरु होती. वादी यांना आपसात तडजोड करुया अशी खोटी आशा दाखविल्यामुळे प्रतिवादी यांना गावपातळीवर वाद संपुष्टात येईल असे वाटले. त्यामुळे, प्रतिवादी हे न्यायालयात कैफियत व म्हणणे दाखल करणेसाठी आले नाहीत. तसेच, वादी यांनी साक्षीदार यांचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन न्यायालयात पुरावा चालू केलेला आहे हे वकीलांच्याकडून समजावुन सांगितल्यानंतर प्रतिवादी यांना लक्षात आले की, प्रतिवादी हे गावपातळीवर आपसात चर्चा चालू ठेऊन केस पुढे चालवित आहेत व प्रतिवादी यांचेविरुध्द प्रस्तुत कामी पुढील आदेश झालेले आहेत. तसेच, प्रतिवादी यांना दावा मिळकतीबाबत जुने आवश्यक माहिती व रेकॉर्ड ऑफीसमधील जुनी कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाली नाहीत. तसेच, प्रतिवादी यांना मुदतीत आपली कैफियत व म्हणणे दाखल करावे लागते याचे कायदेशिर ज्ञान नव्हते.

त्यामुळे, त्यांना मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही. प्रत्यक्षात सदर कारणे व प्रतिवादी हजर झाल्याचा काळ विचारात घेतले असता, प्रस्तुत अर्जात प्रतिवादी यांनी दिलेली कारणे संयुक्तीक नाहीत. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे स्वरुप पाहता प्रतिवादींची प्रस्तुत दाव्याकामी कैफियत व म्हणणे अभिलेखावर येणे दाव्याच्या गुणदोषावर निकालासाठी आवश्यक आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादी क्र.२ व ३ यांचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. प्रस्तुतचा अर्ज ब-याच कालावधीनंतर दाखल केलेला असल्यामुळे, प्रतिवादी यांना प्रत्येकी रक्कम रु.३,०००/- अशी एकुण रक्कम रु.६,०००/- च्या खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.६,०००/- (रुपये सहा हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी.

०३. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.२ व ३ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला).

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.01.09 14:52:56 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०८/०१/२०२६.